RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–अ–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - १० ] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २३ - २९ , २०२१ / पौष २ - ८, शके १९४३ [ पृष्ठे ०२

## प्राधिकृत प्रकाशन

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक साप्रवि/एसटीसी-४३०/२०२१.– महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (वार्षिक प्रशासन अहवाल) अधिनियम, १९६४ मधील तरतुदींनुसार नाशिक जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा सन २०२०-२०२१ च्या एकत्रित वार्षिक प्रशासन अहवालास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १२०५, दिनांक ७ डिसेंबर २०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदरचा अहवाल दिनांक ९ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आला.

**लीना बनसोड,**
भा.प्र.से.,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

नाशिक, ९ डिसेंबर २०२१.

---

**खालील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खाली दर्शविलेल्या दिनांकास प्रसिद्ध झालेली आहे.**

**बुधवार, डिसेंबर २२, २०२१ / पौष १, शके १९४३**

### जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले :** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा २००६.

**आदेश**

क्रमांक पालिका-३/कावि-४२३/२०२१.– महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा, २००६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* च्या तरतुदींनुसार भुसावळ नगरपरिषदेत निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यास्तव, मी, अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, जळगाव मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये या प्रकटनाद्वारे खालील नमूद उमेदवार हे भुसावळ नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष पदासाठी निवडून आल्याचे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव | | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|
| १ | | २ |
| नाटकर राजेंद्र त्र्यंबक | .. | भुसावळ |

**अभिजीत राऊत,**

जिल्हाधिकारी, जळगाव.

जळगाव, २१ डिसेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.